| | Subject – मराठी | Marks: 100<br>Time: 3 Hrs.<br>Set – 3 |
|---|---|---|

## विभाग – १: गद्य

### पठित गद्य

**प्र.१ अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

१) चौकटी पूर्ण करा.

i) भावे सरांनी भौतिकशास्त्र शिकवताना केलेल्या गोष्टी
- शास्त्र शिकवले
- विषयाची गोडी लावली

ii) भावे सरांच्या प्रयोगातून लेखक या गोष्टी शिकला.
- एकाग्रतेचा मंत्र
- विज्ञान

२) एका वाक्यात उत्तर लिहा.

i) भावे सर भौतिकशास्त्र विषय शिकवत.

ii) लेखकाने आई, शिक्षक व शाळा यांना 'संस्कार केंद्र' असे म्हटले आहे.

३) i) पुढील शब्दांचे वचन बदला. अ) भिंग - भिंगे ब) वही - वह्या

ii) पुढील शब्दांचे लिंग बदला. अ) शिक्षक - शिक्षिका ब) मामा - मामी

४) भावे सरांबद्दल लेखकाला प्रचंड आदर व श्रद्धा होती. ते भौतिकशास्त्र शिकवत विज्ञानातील हा विषय शिकविताना त्यांनी केवळ शास्त्र शिकवलं नाही तर त्या विषयाची गोडी लावली आणि त्याचबरोबर जीवनाचं फार मोठं तत्वज्ञान शिकवलं. एके दिवशी त्यांनी एक प्रयोग करून दाखवला भिंगाच्या साहाय्याने सूर्यकिरणांची शक्ती कागदावर एकत्र केल्यास कागद जळतो. हे दाखवून ते म्हणाले "माशेलकर, तुमची ऊर्जाशक्ती एकत्र करा. काहीही जाळता येईल." एकीकडे मला एकाग्रतेचा मंत्र दिला दुसरीकडे विज्ञान समजले. त्यामुळे भावेसरांचे शब्द हीच खरी उर्जा आहे.

**प्र.१ आ) पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती सोडवा.**

१) पुढील शब्दांच्या योग्य त्या जोड्या लावा.

| 'अ' गट | | 'ब' गट | |
|---|---|---|---|
| i) | जुनी बॅट | अ) | सहा रुपये |
| ii) | वडिलांचा पगार | ब) | 24 रुपये |
| iii) | कडक शिस्त | क) | अभ्यास व शाळा |
| iv) | वडील | ड) | व्हॉलीबॉल चॅम्पियन |

२) सहसंबंध लक्षात घेऊन वाक्य पूर्ण करा.

i) माझ्या आई-वडिलांना वाय.एम.सी.ए. मधील खेळांडूकडून माझ्या खेळाबाबत स्तुतीपर उद्गार ऐकू येऊ लागले, ते ऐकून त्यांना आंनद वाटे.

ii) मुलांना प्रार्थना शिकवणारे - काका

iii) वडिलांनी लेखकाला दिलेली शिक्षा - छड्यांची

iv) माझ्या खेळाबाबत स्तुतीपर उद्गार ऐकू येऊ लागले.

i) खालील वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा.

अ) पोलीस निरेक्षक पदाची परिक्षा उत्तीर्ण झाल्यावर रामचा आनंद गगनात मावत नव्हता.

ब) दर वाढदिवसाला कमीतकमी पाच झाडे लावणार अशी खूणगाठ बांधणे.

ii) अचूक शब्द ओळखुन लिहा. अ) मासिक ब) मित्रत्व

४) लहानपणी लेखक घरात जळणासाठी आणलेल्या लाकडातूनच बॅट व स्टंप तयार करीत असत, म्हणजे लहानपणापासून त्यांना क्रिकेटची आवड होती. नंतर लेखक चुलत्यांकडे वाय. एम. सी. ए. च्या कंपाऊंडमध्ये राहत तेव्हा शाळा सुटल्यावर ते धावत धावत ग्राऊंडवर जात. यावरून त्यांना खेळाची ओढ होती, हे कळते. तिथे ते बॉल टाकण्याचे काम करत, त्यातून त्यांना उत्तेजन मिळाले. ते ग्राऊंडसमनलाही मदत करीत. वडील पुण्यात आल्यावर वडिलांनी लेखकांना जुनी बॅट आणून दिली, तेव्हा लेखकांना खूप आनंद झाला. नंतर पुन्हा एकदा पुना क्लबच्या ग्राऊंडवर जो ऑस्ट्रेलियन सर्व्हिसेस व वाय. एम. सी. ए. च्या या दोन संघादरम्यान जो क्रिकेट सामना झाला, तो लेखकांनी झाडावर चढून पाहिला. सामन्यानंतर खेळाडूंच्या स्वाक्षरीसाठी जी झुंबड उडाली ती पाहून लेखकाला मनोमन वाटायला लागले का आपण असे मोठे खेळाडू झालो तर आपल्यामागेही स्वाक्षरीसाठी गर्दी होईल. वर्गात लेखक क्रिकेटची स्वप्ने पाहू लागला. यातूनच लेखकाच्या मनात क्रिकेटचे बीज रुजले व उगवले गेले.

**अपठित गद्य**

**प्र.१ इ) पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती सोडवा.**

१) चौकटी पूर्ण करा.

i) अ) हे मूलं कोणाचे आहे

ब) हे मूल कोणत्या जातीचे आहे

ii) {देवाला आवडणारी पूजा}

↓ माणसांची सेवा

↓ प्राण्यांची सेवा

२) एका वाक्यात उत्तर लिहा

i) संत एकनाथांना देव मुलात दिसला.

ii) संत तुकारामांच्या मते रंजल्या - गांजलेल्यांची सेवा करणारा खरा साधू होय.

३) i) अधोरेखित शब्दाचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा. - शिकाऱ्याने ससे पकडले.

ii) वचन बदला. अ) साधू - साध्वी ब) देव - देवी

४) आपले कार्यच देवाची पूजा असते आपले काम फळाची अपेक्षा न करता करावे. केलेले कार्य सद्विचाराने केलेले असावे. समाजातील अनेक लोक विनालोभ जनकार्य करत असतात संतांनी जनकार्यात सहभाग घेऊन मानवसेवा हीच ईश्वरसेवा आहे असे दाखवून दिले आहे. समाजातील गरजूंना मदत करावी हे करत असताना फळाची अपेक्षा न करता हे काम करावे. आपले काम देवाने दिलेले आहे असे मानावे.

**विभाग – २ : पद्य**

**प्र.२ अ) खालील कृति करा.**

१) i) खालील शब्धसमूहांचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.

माना उंचावलेले हात - हक्कासाठी पुढे होणे, हक्क मागणे

ii) कवितेच्या आधारे कृती पूर्ण करा.

कवीचा प्रयत्नवाद आणि आशावाद दाखवणारी ओळ.

शेकडो वेळा चंद्र आला; तारे फुलले, रात्र धुंद झाली;

भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली.

२) आकृती पूर्ण करा.

कवींच्या हातांची वैशिष्ट्ये.

| सर्व असलेले | दारिद्र्याकडे गहाण असलेले | माना उंचावलेले | कलम झालेले |
|---|---|---|---|

३) कष्टकरी, कामगार सतत आयुष्य जगण्यासाठी लढत असतात. हे आयुष्य लढत असताना हे आयुष्य लढत असताना त्यांना पोटभर अन्न मिळत नाही. नैसर्गिकसौंदर्यापासून ते वंचित असतात. स्वत:च्या हक्कासाठी लढताना सुद्धा त्यांना अपमान सहन करावा लागतो त्यांच्या आयुष्यात त्यांना मदत करणारे असे कोणीही नसते प्रत्येक दिवस हा कठोर परीक्षेचा व यातनेचा असतो. तरीही या जगात स्वत:ची जागा बनविण्यासाठी कसोशीने प्रयत्न करतात. दु:ख सहन करून दु:खातही आनंदी राहण्याची कला ही कष्टकरी कामगारांकडेच असते.

४) कष्ट करताना दिवस कसे जातात हे कळतच नाही. कष्ट करून सुध्दा यश पदरी पडत नाही. पूर्ण आयुष्य जगण्यासाठी लढताना अजून किती दिवस हे कष्टमय जीवन जगायचे याचा कष्टकरी हिशोब करत आहे.

**प्र.२ आ) 'योगी सर्वकाळ सुखदाता' व 'रंग मजेचे रंग उद्याचे' या दोन कवितांपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील मुद्द्यां अनुसरुन कृती सोडवा.**

१) 'रंग मजेचे रंग उद्याचे'

अ) कवितेचे कवी / कवयित्री → अंजली कुलकर्णी.

ब) कवितेचा रचनाप्रकार → निसर्गमाहात्म्यपर गीतरचना

ड) कवितेतून व्यक्त होणारा भाव → पर्यावरणाची जोपासना व निसर्गसौंदर्याच्या आविष्करात जगण्याचा आनंद असा संदेशपर आशावाद प्रसन्नता निर्माण करतो.

इ) कवितेतून व्यक्त होणारा विचार → आजच्या आधुनिक काळात विज्ञानाने अफाट प्रगती केली आहे; संगणक युग अवतरले आहे. तरीसुद्धा माणसाचा मातीशी संबंध तुटता कामा नये. पर्यावरणाची जोपासना करण्यात मानवाचे हित आहे. निसर्गाशी समरस होऊन जगताना मानवाला खराखुरा आनंद प्राप्त होईल, असा दृष्टिकोन या कवितेत मांडला आहे.

ई) कवितेतून मिळणारा संदेश → 'रंग मजेचे, रंग उद्याचे' या कवितेमध्ये कवयत्री अंजली कुलकर्णी यांनी यंत्रयुगातही पर्यावरण सुंदर ठेवावे, म्हणजे मानवी मनेही समृद्ध होतात हा संदेश दिला आहे. मानवाने पर्यावरणाची जोपासना केली पाहिजे. निसर्गाशी रममाण घेऊन जगण्यातच खरा आनंद आहे, हा मौलिक संदेश ही कविता देते.

**प्र.२ इ) पुढील ओळींचे रसग्रहण करा:**

आशयसौंदर्य : प्रसिद्ध मराठी कवी किशोर पाठक यांची 'स्वप्न करु साकार' या कवितेतील हे ध्रुपद आहे. या देशभक्तीपर गीतात देशाची ऋषिसंस्कृती, श्रमप्रतिष्ठा, एकात्मतेचे सामर्थ्य या मूल्यांचे महत्त्व पटवून देणे, ही या कवितेची मध्यवर्ती कल्पना आहे.

काव्यसौंदर्य : प्रस्तुत ओळींमध्ये कवींनी पहिल्या ओळीत भारतीयांचा मातीवरचा हक्क सांगितला आहे. तर दुसऱ्या ओळीत नव्या युगाचे स्वप्न साकार करणे, या कर्तव्याची जाणीव करुन दिली आहे.

भाषिक वैशिष्ट्ये : 'अधिकार' व 'साकार' या प्रत्येक ओळीतील शेवटच्या शब्दातील ध्वनिसाधर्म्यामुळे ही यमकप्रधान रचना आहे. यातील भाषा ओघवती असून ही गेयरचना सुलभ व ओठांत पटकन रुळणारी आहे. मोठा विचार सोपेपणाने सांगण्याची आवाहकता कवितेला सौंदर्य प्राप्त करुन देते.

## विभाग – ३: स्थूलवाचन

**प्र.३ पुढीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.**

१) टिपा लिहा.

i) बार्क - बार्क हे 'भाभा अँटॉमिक रिसर्च सेंटर' म्हणजे 'भाभा अणुसंशोधन केंद्र' या नावाने लघुरूप आहे. भाभा यांनी भारतातील अणुसंशोधनाचा पाया घातला, म्हणून त्यांचे नाव या संस्थेला दिले आहे. बार्क ही संस्था आता प्रचंड मोठी आहे.

ii) डॉ. होमी भाभा - डॉ. होमी भाभा हे प्रचंड स्फूर्तिदायक व्यक्तिमत्त्व होते. डॉ. होमी भाभा संस्थेत काम करायला आलेल्या मुलांना म्हणत, सर्वजण संशोधन करत रहा, त्यासाठी सरकारला खर्च किती येतो याचा विचार करू नका, तुम्ही स्वतःच काम निर्माण करा. आपण काय काम करायचं हे स्वतःच ठरवा बॉसने सांगितलं तेवढंच काम करायचं आणि सांगितलं नसेल तर आपल्याला कामचं नाही अस समजायचं, हे चूक आहे ही प्रवृत्ती गेली पाहिजे. स्वतःला सक्षम करण्याचे पाठ मुलांना देत असत.

२) 1938 साली मुंबई येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले होते. स्वा. सावरकर या संमेलनाचे अध्यक्ष होते. व्युत्पत्ती कोश रचनेचे कार्य हाती घ्यावे, असा ठराव या संमेलनात मंजूर करण्यात आला कृ. पा. कुलकर्णी यांच्यावर या कार्याची जबाबदारी सोपवण्यात आली बॅ मुकुंदराव जयकर यांच्या आर्थिक सहकार्यामुळे व श्री दाजीसाहेब तुळजापूरकर यांनी पुरस्कृत केल्यामुळे व्युत्पत्ती कोश निर्मितीस भरीव मदत झाली. 1946 साली या मराठी व्युत्पत्ती कोशाचे पहिले प्रकाशन झाले. यानंतरही व्युत्पत्ती कोशाच्या आवृत्त्या निघालेल्या आहेत.

३) पाण्याचा अभाव, रेताड जमीन आणि कडक कोरडेपणा हे वाळवंटी प्रदेशाची वैशिष्ट्ये आहेत. पाण्यावाचून जीवन फुलू शकत नाही. परंतु वाळवंटी प्रदेशात तेथील विशेष जीवसृष्टी आहे. वनस्पती आहेत व त्या वनस्पतींवर जगणारे प्राणी आहेत. वाळवंटी प्रदेशाला मरुभूमी म्हणतात. वाळवंटी प्रदेशात वर्षांतून एखादाच पाऊस पडतो, तर कधी तीन-तीन वर्षे तो बेपत्ता असतो. अवर्षणाच्या या काळात वाळवंटी प्रदेश भकास व ओसाड असतो. जीवन निष्प्राण होते. मग एक दिवस पाऊस पडतो आणि जादू होऊन झाडाझुडपांना पालवी फुटते बियांमधून रोपे उगवतात. रोपांवर भरगच्च फुले फुलतात. त्या काळात हा ओसाड भूप्रदेश बिगच्यासारखा दिसतो. स्वप्नासारखा काही काळ टिकतो. जणू वाळवंटात स्वर्गच अवतरतो. वाळवंटातील अशक्यप्राय जीवन या काळात थोडेसे का होईन सजीव होते. म्हणून 'निसर्ग हा मोठा जादूगार आहे' असे म्हटले आहे.

## विभाग – ४: भाषाभ्यास

**प्र.४ अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.**

१) खालील वाक्यातील अधोरोखित शब्दांचा समास ओळखून लिहा :

i) भाजीपाला - समासाचे नाव - समाहार द्वंद्व समास ii) सप्ताह - समासाचे नाव - व्दिगू समास

२) अलंकार

कल्पवृक्ष जणू देवदूतच.

| उपमेय | उपमान | साधर्म्यवाचक शब्द | अलंकार |
|---|---|---|---|
| कल्पवृक्ष | देवदूत | जणू | उत्प्रेक्षा |

३) वाक्यरुपांतर

i) तू विजयी व्हावेस असे मला वाटते. ii) मी आपल्या सेवेसाठी आलो नसतो का?

४) कंसातील शब्दांचे विभक्ती रूप योजून त्याचे सामान्यरूप करून वाक्य पुन्हा लिहा.

i) "मुलाला काय झाले पहा हो !" ii) आईच्या हातात भाकरीचा तुकडा असे.

५) खालील वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा.

i) क्रोध येणे - संतोषने सांगितलेले काम न केल्यामुळे बाबांना क्रोध आला.

ii) अशुभ मानणे - मृत व्यक्तीच्या राहिलेल्या वस्तू अशुभ मानतात.

**प्र.४ आ) भाषासौंदर्य**

१) i) समानार्थी शब्द लिहा.

अ) धीर = हिंमत ब) मांडी = अंक

ii) विरुद्धार्थी शब्द लिहा.

अ) परिचित × अपरिचित ब) सौभाग्य × दुर्भाग्य

iii) एका शब्दाचे अनेक अर्थ लिहा.

वृक्ष -------- झाड -------- तरु

iv) शब्दसमुहाबद्दल एक शब्द लिहा.

एखाद्या पुर्ततेसाठी केलेला निश्चय - संकल्प

२) i) अचूक शब्द ओळखा. - कीर्ति, किरती, कीर्ती, किरति - किर्ती

ii) लेखननियमांनुसार बदल करा. - दोन महिन्यात पन्नास पौंड वजन कमी करेन

३) i) विरामचिन्हांची नावे लिहा.

अ) " " - दुहेरी आवतरण चिन्ह ब) ; - अर्धविराम

ii) चुकीची विरामचिन्हे बदला. - किती सुंदर गाव आहे हे !

४) खालील शब्दांना पारिभाषिक शब्द लिहा. अ) Event - घटना ब) Bridge - पूल

५) विस्मयकारी शब्द लिहा. अ) अरेव्वा ! ब) बापरे !

**विभाग – ५: उपयोजित लेखन**

प्र.५ अ) पत्रलेखन

१) दि. ५ जून, २०१६

प्रति,

माननिय अधिकारी,

पुणे महानगरपालिका,

पुणे.

विषय – रस्त्यावरील कचरापेटीच्या दुर्दशेबाबत तक्रार पत्र.

माननीय महोदय/महोदया,

सप्रेम नमस्कार.

मी अ. ब. क., सदाशिव पेठ, पुणे येथे राहतो. माझ्या घरासमोरच महानगरपालिकेतर्फे कचऱ्यासाठी एक पेटी ठेवलेली आहे. दुर्दैवाची गोष्टी अशी की, विभागातील लोक कचरा टाकताना तो कचरापेटीतच पडेल याची थोडीही काळजी घेताना दिसत नाहीत. त्यामुळे जवळपास सर्वच कचरा पेटीच्या बाहेर पडलेला असतो. कचरा जमा करणारे तर तो आणखीनच इकडे-तिकडे पसरवतात. भटकी कुत्री रात्रभर तेथेच गोळा होऊन जोरजोरात भुंकत असतात.

शिवाय आपल्या महानगरपालिकेतर्फे येणारी कचरा उचलणारी गाडी दोन ते तीन दिवसांनी येते. त्यामेळे बराच कचरा जमा होतो व त्याला भयंकर दुर्गंधी सुटलेली असते. त्यामुळे विभागातील लोकांचे आरोग्य बिघडेल अशी चिंता आम्हाला लागलेली आहे.

तरी आपण कृपया या गोष्टीकडे वैयक्तिक लक्ष देऊन यातून आमची सुटका करावी, ही नम्र विनंती.

कळावे, तसदीबद्दल क्षमस्व.

आपला विश्वासू

अ.ब.क.

१३५, साईसदन,

सदाशिव पेठ,

पुणे ४११०४०

२) तापलेल्या वाळूत रडणारे मूल नाथांनी उचलले तेव्हा ते कोणाचे आहे, मूल कोणत्या जातीचे आहे, हा विचारही त्यांच्या मनात डोकावला नाही. कारण त्या मुलातच त्यांना देव दिसत होता.

देवानेच निर्माण गोष्टी देवाला वाहून देवाची पूजा करण्याऐवजी देवाने निर्माण केलेल्या या माणसांची, प्राण्यांची सेवा केली, अपंग, दुर्बलांसाठी आपला वेळ, आपली शक्ती खर्च केली, तर तीच खरी ईशपूजा ठरेल. म्हणून संत तुकाराम महराज सांगतात की, जो रंजल्या - गांजलेल्यांना आपले समजून त्यांची सेवा करील, तोच खरा संत, तोच खरा साधू. अशा सेवाभावी व्यक्तीत देवत्व अवतरलेले असते.

**प्र.५ आ) पुढील कृती सोडवा.**

१) खालील शब्दांचा आधार घेऊन आकर्षक जाहिरात तयार करा.

मोठ्या प्रवासी बॅगांवर ३०% सूट

प्रवासी बॅग्ज

“प्रवास तुमचा सुखकर प्रयत्न हाच निरंतर”

सुनंदा कारखानीस

यांचे प्रवासी बॅगजचे भव्य प्रदर्शन

विविध आकाराच्या, सुंदर रंगांच्या, मजबूत, टिकाऊ

बॅगांची विक्री

मुलांचा खाऊ सांभळणाऱ्या बॅगा

आजीचा बटवा जपणाऱ्या बॅगा

फक्त दोन दिवस

काय मग येताय ना !!!

दि. १ व २ मे, २०१८

सकाळी १० ते सायं. ८ संपर्क : ९२९२९९xxxx

पत्ता : शिवाई मैदान, कानडे चौक, पेण.

२) रक्तदान शिबिराचा वृत्तांत

ऐरोली, दि. १० मार्च (प्रतिनिधी) – येथील लाईफलाईन मंडळाने आपल्या वर्धापनदिनानिमित्त दि. ६,७,८ मार्च रोजी

रक्तदान शिबिर आयोजित केले होते. 'संजीवनी हॉस्पिटलच्या' सहाय्याने हे शिबिर संपन्न झाले. या शिबिराचे उद्घाटन आमदार 'श्री. विजय चौगुले' यांनी केले. सर्वसामान्य नागरिकांमध्ये रक्तदानाविषयी असलेले गैरसमज दूर व्हावेत व त्याचे महत्त्व लोकांना समजावे, हा या शिबिराचा उद्देश होता. 'रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान' या ब्रीदचा प्रसार हे आमचे ध्येय आहे असे मंडळाचे अध्यक्ष श्री. प्रकाश राऊत यांनी सांगितले. या शिबिराला सर्वसामान्य नागरिकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. तीन दिवसांत एकूण ६०० बाटल्या रक्त जमा करण्यात आले. हे सर्व रक्त सुरक्षितरित्या रक्तपेढीमध्ये ठेवण्यात आले.
शेवटच्या दिवशी रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांचा सत्कार करुन त्यांना मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. या प्रसंगी अध्यक्ष म्हणून महापौर श्री. जगजीतसिंग उपस्थित होते. या प्रकारची आणखी शिबिरे आयोजित करुन रक्तदानाचा प्रसार करण्याचा निर्धार या प्रसंगी करण्यात आला.

**प्र.५ इ) लेखनकौशल्य**

**१) खालील प्रसंगी तुम्ही उपस्थित होता. त्या भावपूर्ण प्रसंगाचे लेखन करा.**

मला अजूनही आठवतो तो दिवस. २४ जुलै, वेळ संध्याकाळी ६ वाजून २० मिनिटे. मुसळधार बरसणारा पाऊस जणू आमच्या दु:खात सहभागी झाला असावा. प्रसंग होता पाकव्याप्त काश्मीरमध्ये आतंकवाद्यांसोबत झालेल्या गोळीबारात शहीद झालेले मेजर रमाकांत यांना देण्यात आलेल्या भावपूर्ण श्रद्धांजली कार्यक्रमाचा. तो प्रसंग काही केल्या माझ्या आठवणींच्या पटातून पुसला जाणार नाही इतका हुबेहूब अजूनही मला आठवतो. त्या मावळत्या सूर्याबरोबर वाढत जाणारी शांतता आणि सगळयांचे भारावलेले पाणावलेले डोळे. आदर्श विद्यालयाच्या पटांगणात बांधलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये आम्ही सर्वजण जमलो होतो. म्हणजेच मी आणि आमच्या अकोला शहरातील लोक. सर्वांचा उर अभिमानाने भरून येईल असा तो प्रसंग असला तरी एक वीरपुरूष आपण गमावला याचे दु:खही लोकांना वाटत होते.
शहीद मेजर रमाकांत यांचे छायाचित्र समोरच्या टेबलावर ठेवण्यात आले होते. देशासाठी प्राण अर्पण केल्याचे समाधान छायाचित्रातल्या त्यांच्या स्मितहास्याकडे पाहून जाणवत होते. जमलेल्या सगळयांनी मेणबत्त्या पेटवून एक-एक करून टेबलावर ठेवल्या आणि तेथीलच एक सेवानिवृत्त सेना अधिका-यांनी सगळयांना दोन मिनिटे मौन पाळून शहीद मेजर रमाकांत यांना श्रद्धांजली देण्याचे आवाहन केले. ते दृश्य पाहून खरोखरच देशासाठी प्राण दिलेल्या त्या बहादुरासाठी गर्व वाटला परंतु पुढच्याच क्षणी आता त्यांच्या कुटुंबाचे काय होईल हा विचार डोक्यात आला. शाळेत जाणारी त्यांची मुले, त्यांचे शिक्षण, मागे राहिलेले म्हातारे आई-वडील, बायको. आता काय होईल? दुस-याच क्षणी माझी नजर तिथेच बसलेल्या त्यांच्या संपूर्ण कुटुंबाकडे गेली. त्यांच्या चेह-यावर स्वत:च्या भविष्याबद्दल थोडीही चिंता मला जाणवली नाही. उलट असे अजूनही पुत्र असते तर देशासाठी प्राणार्पण करण्यासाठी त्यांनाही पाठवले असते असेच त्यांना वाटत असावे असे मला जाणवले. थोड्याच वेळात मेजर रमाकांत यांच्या पत्नी बोलण्यास समोर आल्या. त्यांनीही स्वत: सैन्यात जाण्याची इच्छा दर्शविली तेव्हा खरोखरच असे वाटले की, देशासाठी बलिदान देण्याची संधी जरी मला मिळाली तर माझ्यासारखा भाग्यवान मीच असेन!'

*This question paper is for practice purpose only.